अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य सामाजिक परिवर्तनाची चळवळ - छगन भुजबळ

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे केवळ साहित्यनिर्मिती नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. श्रमिक, वंचित, दलित, भटके-विमुक्त, कष्टकरी आणि उपेक्षित समाजाच्या वेदनांना त्यांनी आपल्या लेखणीतून आवाज दिला. श्रमाला प्रतिष्ठा, सामाजिक समता आणि अन्यायाविरुद्ध संघर्षाची प्रेरणा देणारे त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत, असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.

येथील महाकवी कालिदास कलामंदिर येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात तसेच त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंत्री गिरीश महाजन, महापौर हिमगौरी आडके-आहेर, आ. देवयानी फरांदे, आ. हिरामण खोसकर आदी उपस्थित होते. भुजबळ यांनी अण्णा भाऊ साठे यांनी उभे केलेले साहित्यविश्व आणि सामाजिक कार्य चिरंतन असल्याचे नमूद केले. त्यांचे साहित्य केवळ कल्पनारम्य नसून सामान्य माणसाच्या जगण्यातील वास्तवाचे प्रतिबिंब आहे. त्यांच्या साहित्याचे रशियनसह अनेक परदेशी भाषांमध्ये भाषांतर झाले आणि जागतिक स्तरावर त्यांच्या प्रतिभेची दखल घेण्यात आली. श्रमाला प्रतिष्ठा, माणसाला सन्मान आणि सामाजिक न्याय या मूल्यांचा स्वीकार करून समताधिष्ठित समाज निर्माण करणे, हीच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना खरी अभिवादन ठरेल, असे मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले.

नाशिक शहरात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी अन्न, नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, मंत्री गिरीश महाजन आदी.

मंत्री महाजन यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर शोषित, वंचित आणि कष्टकरी समाजाला स्वाभिमान, संघर्ष व सामाजिक परिवर्तनाची दिशा देणारे क्रांतिकारी विचारवंत होते असे सांगितले. त्यांच्या विचारांचा वारसा समाज परिवर्तनासाठी प्रेरणादायी असून महापुरुषांना कोणत्याही जाती-समाजाच्या चौकटीत न पाहता त्यांच्या विचारांचे अनुकरण करणे आवश्यक आहे. मातंग समाजातील महिलांच्या सन्मानजनक पुनर्वसनासाठी महानगरपालिकेमार्फत नियमित मानधन योजना राबविण्याची आवश्यकता आहे. मातंग समाजाच्या वस्त्यांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता तसेच शौचालय आदी मूलभूत सुविधांची कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित विकासकामेही प्राधान्याने पूर्ण करण्यात येत आहेत. समाजाच्या सर्वांगीण विकासाबरोबरच सन्मानजनक पुनर्वसनालाही तितकेच महत्त्व देण्याची गरज आहे, असे त्यांनी नमूद केले. दरम्यान, कार्यक्रमाच्या सुरुवातीला साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष विनायक पांडे यांनी प्रास्ताविक केले. आभार शाहू खैरे यांनी मानले.

महसूल खात्याची भूमाफियांवर कारवाई

मूळ मालकांची नावे ७/१२ वर पूर्ववत

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : संगमेश्वर भागातील नवीन शर्तीच्या जमिनीची बेकायदेशीर अदलाबदल करून शासनाची फसवणूक करणाऱ्या भूमाफियांना महसूल खात्याने मोठा दणका दिला आहे. विभागीय आयुक्तांचा आदेश कायम ठेवत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा अदलाबदल व्यवहार रद्द ठरवला आहे. यानंतर महसूल प्रशासनाने तातडीने वादग्रस्त जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर पूर्ववत मूळ मालकांची नावे नोंदवण्याची कारवाई केली आहे.

सन २०१३ मध्ये येथील संगमेश्वर शिवारातील ४.५५ हेक्टर आणि गुगुळवाड येथील ४.६१ हेक्टर या एकमेकांपासून दूर असलेल्या जमिनींची नियमबाह्य अदलाबदल करण्यात आली होती. तत्कालीन प्रांताधिकार्यांनी यासंदर्भात परवानगी दिली होती. नियमानुसार जमिनी सलग नसल्याने अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी २०२३ मध्ये ही परवानगी रद्द केली. या विरोधात केलेले अपील विभागीय आयुक्त आणि महसूल मंत्र्यांनी फेटाळून लावले. अदलाबदलीनंतर या शेतजमिनीचे तुकडे पाडण्यात आले. तुकडेबंदी कायदा मोडून तब्बल १६४ जणांना बैल गोठा या नावाने हे भूखंड विक यात आले व त्यांचा वापर बेकायदेशीरपणे रहिवासासाठी बदलण्यात आला. यात शासनाचा नजराणा न भरता खरेदीखते नोंदवून करोडो रुपयांचा महसूल बुडवण्यात आल्याची तक्रार झाली होती. या प्रकरणी मध्यंतरी आमदार गोपीचंद पडळकर यांनी विधिमंडळात लक्षवेधी मांडल्यानंतर या घोटाळ्याच्या चौकशीला गती मिळाली. गैरव्यवहाराचा ठपका ठेवत तत्कालीन उपविभागीय अधिकारी उदय किसवे यांना याप्रकरणी निलंबित करण्यात आले होते, तर दुय्यम निबंधक कार्यालयातील ८ तत्कालीन अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाच्या कारवाईची टांगती तलवार आहे.

या कारवाईमुळे भूमाफियांचे धाबे दणाणले आहे.

लाच स्वीकारताना पोलीस उपनिरीक्षकासह दोघे जाळ्यात

नाशिक : मुलाविरुद्ध पॉक्सो कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यात आई-वडिलांना आरोपी करण्याची धमकी देत तसे न करता मदत करण्यासाठी २० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पोलीस उपनिरीक्षकासह खासगी व्यक्तीला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात ताब्यात घेतले आहे.

सुरगाणा पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत शिवाजी दवंगे (५७, तारा निवास, साईनगर, पिंपळगाव बसवंत, निफाड) आणि खासगी व्यक्ती इब्राहिम करीम वाणी (२८, जामुनमाथा, भोरमाल, सुरगाणा) अशी संशयिताची नावे आहेत. तक्रारदाराच्या मुलाविरुद्ध सुरगाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात पोक्सो कायद्याचे कलम वाढ होऊन त्याला अटक करण्यात आली. नंतर तो कारागृहात होता. पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत दवंगे यांनी १९ जून २०२६ रोजी तक्रारदारास पोलीस ठाण्यात बोलावत दिवसभर बसवून ठेवले. तक्रारदार व त्याच्या पत्नीला गुन्ह्यात आरोपी करतो, अशी धमकी दिली. आरोपी करायचे नसल्यास आणि या गुन्ह्यात मदत करण्यासाठी ५० हजार रुपयांची लाच मागितली. या संदर्भात तक्रार आल्यानंतर पंचांसमक्ष पडताळणी करण्यात आली. तेव्हा उपनिरीक्षक दवंगे व तक्रारदार यांच्यात या संदर्भात चर्चा झाली. पंचांसमक्ष ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती २० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केले.

त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा रचला. एकदा उपनिरीक्षक दवंगे याने लाचेची रक्कम स्वीकारण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदारास पाठविण्यात आले. तेव्हा उपनिरीक्षक दवंगे याने लाचेची रक्कम सुरगाणा पोलीस ठाण्याच्या जुन्या इमारतीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील किराणा दुकानात काम करणारा खासगी व्यक्ती इब्राहिम वाणी याच्याकडे देण्यास सांगितली. वाणी याच्यामार्फत उपनिरीक्षक दवंगे याने २० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिली.

या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत दवंगे आणि खासगी व्यक्ती इब्राहीम वाणी या दोघांविरुद्ध सुरगाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिकमध्ये गुटख्यासह सहा लाखांचा मुद्देमाल जप्त

नाशिक : जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूच्या साठवणूक आणि वाहतुकीविरोधात तीन ठिकाणी धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत सहा लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहआयुक्त (अन्न) मंगेश माने आणि सहाय्यक आयुक्त (अन्न) संदीप देवरे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. हरसूल पोलीस ठाण्याच्या हद्दीत सलमान बाबाखान शहा याच्याकडून प्रतिबंधित अन्नपदार्थांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. या कारवाईत १ लाख ८ हजार ६६ रुपये किमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी हरसूल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मालेगाव येथील रमजानपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत साजिद अख्तर मोहम्मद मुस्तफा अन्सारी याच्याकडून प्रतिबंधित अन्नपदार्थांचा साठा आणि वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. या कारवाईत दोन लाख एक हजार ८०० रुपये किंमतीचा प्रतिबंधित साठा तसेच तीन लाख रुपये किमतीचे वाहन असा एकूण ५ लाख १ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत योगेश सोनजे याच्याकडून प्रतिबंधित अन्नपदार्थांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कारवाई करण्यात आली. या कारवाईत ५४ हजार रुपयांहून अधिक किमतीचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.
नोंदणीकृत कार्यालय: ११ वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई- ४०००१३.
सीआयएन क्र. : यू६७१९०एमएच२००८पीएलसी१८७५५२. संपर्क क्र. (०२२) ६१८२७४१४

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

(सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट नियम, २००२ च्या नियम ८(१) सहवाचता परिशिष्ट ४ यानुसार)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड याचा अधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचता निर्देशित कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खालील कर्जदार आणि सह-कर्जदार यांना सदर नोटिसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत नोटिसमध्ये नमूद केलेली रक्कम परतफेड करण्यास सांगणारी मागणी नोटीस जारी केली.

कर्जदार, रक्कम परतफेड करण्यास अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला सूचना देण्यात येत आहे की, संबंधित न्यायालयीन आयुक्तांनी वरील निर्देशित कायद्यांतर्गत त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करून, संबंधित न्यायालयांच्या आदेशानुसार येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा भौतिक ताबा घेतला आहे आणि नमूद केलेल्या तारखांना निम्नस्वाक्षरीकार अधिकृत अधिकाऱ्याकडे सुपूर्द केला आहे.

तारण ठेवलेल्या मालमत्तेची परतफेड करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष निर्देशित कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे वेधले जात आहे.

कर्जदार, विशेषतः, आणि सर्वसामान्य जनतेला, याद्वारे सावध करण्यात येत आहे की त्यांनी मालमत्तेचा कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार हा खाली नमूद केलेल्या रकमेवर, त्यावरील व्याज आणि दंडात्मक व्याज, शुल्क, खर्च इत्यादींसह यासाठी टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या शुल्क आकारणीच्या विषयाधीन असेल.

कर्ज खाते क्र.: ९३९७३६० आणि ९९३८२०९ आणि १०६७७१३९ आणि टीसीएचआयएन०६०१०००१०००६९२१२

कर्जदार/ कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधी यांचे नाव: श्री. गोविंद शंकरराव पोळे आणि श्रीमती मंगला गोविंद पोळे

मागणी सूचनेनुसार/ सूचनेच्या तारखेनुसार रक्कम: दि. १४.१०.२०२४ रोजीनुसार रक्कम रु. २२,१८,०५३/- (रुपये बावीस लाख अठरा हजार त्रेपन्न फक्त)

भौतिक ताबा मिळाल्याची तारीख: २७.०७.२०२६

तारण ठेवलेल्या मालमत्तेचे/ स्थावर संपत्तीचे वर्णन: अनुसूची- अ सर्वेक्षण क्र. २१/३अ+२ब+२१/३ब/१, प्लॉट क्र. ०१ त्यापैकी, त्यावर सदनिका क्र. ०३ क्षेत्रफळ मोजमापे ५६.८८ चौ. मी. स्टील्ट फ्लोअरवर, कामटवाडे येथील 'सप्तश्रृंग ॲनेक्स' यामध्ये, नाशिक महानगरपालिका हद्दीतील यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि खालीलप्रमाणे सीमाबद्ध: पूर्वेकडे किंवा त्यादिशेला: सीमेवरील जागा, पश्चिमेकडे किंवा त्यादिशेला: सदनिका क्र. ०४, दक्षिणेकडे किंवा त्यादिशेला: सीमेवरील जागा, उत्तरेकडे किंवा त्यादिशेला: सदनिका क्र. ०२.

कर्ज खाते क्रमांक: ९१३२१८७

कर्जदार/ कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधीचे नाव: श्री. अनिल सुखदेव सोनावणे आणि श्रीमती सुनिता अनिल सोनावणे

मागणी सूचनेनुसार/ सूचनेच्या तारखेनुसार रक्कम: दि. १४ जून २०१९ रोजीनुसार रक्कम रु. ११,४१,२४१/- (रुपये अकरा लाख एक्केचाळीस हजार दोनशे एक्केचाळीस फक्त)

भौतिक ताबा मिळाल्याची तारीख: २७.०७.२०२६

तारण ठेवलेल्या मालमत्तेचे/ स्थावर संपत्तीचे वर्णन: अनुसूची- अ

धारण जमीन क्षेत्रफळ मोजमापे हेक्टर ००.३३ दक्षिणेकडील बाजूस डी.पी. रोडजवळ जी. नं. १०३/१/ए/२ यापैकी, एकूण क्षेत्रफळ मोजमापे हेक्टर ००.६२ येथे स्थित चुंचाळे, तालुका आणि जिल्हा नाशिक, नाशिक महानगरपालिकेच्या हद्दीमधील, नाशिक नोंदणी आणि उपनोंदणी जिल्ह्यातील यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, खालीलप्रमाणे सीमाबद्ध: पूर्व: जी. नं. ९९, १००, १०२ चा भाग, पश्चिम: प्रस्तावित डी. पी. रोड आणि जी. नं. १०९ व १०८, दक्षिण: जी. नं. १०३ चा भाग, उत्तर: जी. नं. १०३/१/ए/२ यापैकी उर्वरित क्षेत्र.

अनुसूची- ब मेडगेनगर येथील 'ए' टाइप इमारतीमधील २७.८८ चौ. मीटर बिल्ट अप क्षेत्रफळाची अपार्टमेन्ट/ रो हाऊस क्र. ए - १० असलेली बांधलेली जागा रो हाऊस अपार्टमेन्ट, सोबतच पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केल्यानुसार जमिनीतील २.००% म्हणजेच ४८.२८७ चौ. मीटर मालकी हक्क यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल.

दिनांक: ०२.०८.२०२६ | सही/-
ठिकाण: नाशिक | अधिकृत अधिकारी
टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांच्यासाठी

Chola Enter a better life
चोलामंडलम इन्वेस्टमेंट एंड फाइनेंस कम्पनी लिमिटेड
कॉर्पोरेट कार्यालय : "चोला क्रेस्ट", सी54 आणि सी55, सुपर बी-4, तिरु वी का औद्योगिक वसाहत, गिंडी, चेन्नई-600032.
शाखा कार्यालय : - 302, 303, आणि 304, सह्याद्री बिझनेस पार्क इंक, तिसरा मजला, त्र्यंबक रोड, एमआयसीओ सर्कल, नाशिक- 422002

ताबा सूचना [नियम ८ (१) अंतर्गत]

ज्याअर्थी, खाली सही करणारा हा मेसर्स चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड यांचा अधिकृत अधिकारी असून, सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (यापुढे "सदर अधिनियम" म्हणून उल्लेख) अंतर्गत तसेच सदर अधिनियमाच्या कलम 13(12) अन्वये व सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 मधील नियम 3 सह वाचून प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खालील तक्त्यात स्तंभ (B) मध्ये नमूद केलेल्या कर्जदारांना, स्तंभ (C) मध्ये नमूद केलेल्या दिनांकांना मागणी नोटिसा निर्गमित करून, स्तंभ (D) मध्ये नमूद केलेली थकबाकी रक्कम त्यावरील व्याजासह सदर नोटीस प्राप्त झाल्यापासून 60 दिवसांच्या आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. कर्जदारांनी देय रक्कम परतफेड करण्यात अपयश आल्यामुळे, कर्जदार तसेच सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** हा अधिनियमाच्या कलम 13(4) सह सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 मधील नियम 8 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली स्वाक्षरी करणाऱ्या अधिकाऱ्याने **दिनांक 30/07/2026 रोजी** घेतला आहे. सदर कारवाई **माननीय मुख्य न्यायदंडाधिकारी नाशिक यांनी Cri.M.A Case No.521/2022 मध्ये दिनांक 17/09/2022 रोजी दिलेल्या आदेशानुसार** पारित करण्यात आली आहे. कर्जदारांना विशेषतः तसेच सर्वसामान्य जनतेस सर्वसाधारणपणे यामार्फत सावध करण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या मालमत्तांबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये व असा कोणताही व्यवहार हा स्तंभ (D) मध्ये नमूद केलेल्या रकमेपुरता तसेच त्यावरील व्याज व इतर सर्व शुल्कांसह मेसर्स चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या हक्काधीन (चार्ज) राहील. तसेच, सिक्युरिटायझेशन अधिनियमाच्या कलम 13(8) अन्वये, विक्रीची सूचना निर्गमित होण्यापूर्वी, सर्व खर्च, शुल्क व इतर खर्चांसह संपूर्ण थकबाकी रक्कम अदा करून कर्जदारांना सुरक्षित मालमत्ता परत मिळविण्याचा (रिडीम करण्याचा) अधिकार आहे.

अनु क्र.	कर्जदाराचे नाव आणि पत्ता आणि कर्ज खाते क्र.	मागणी सूचनेची तारीख	थकबाकी रक्कम	ताब्याची तारीख
[A]	[B]	[C]	[D]	[E]
1	कर्ज खाते क्र.: X0HESAN00001958351 आणि X0HESAN00002391852 **1. गणेश फुलचंद रानमळे, 2. प्रियंका गणेश रानमळे, 3. सुनील फुलचंद रानमळे, 4. दत्तात्रय फुलचंद रानमळे, 5. अनुसया फुलचंद रानमळे, पत्ता:** प्लॉट क्रमांक 61, भैरवनाथ नगर, नायगाव रोड, सिन्नर, नाशिक – 422103. **6. मेसर्स त्रिवेणी धान्य भंडार** 730-ब कहडकपुरा मुंगे गल्ली सिन्नर नाशिक, सिन्नर - 422103	08/06/2021	05/06/2021 रोजी रु. 39,54,821/- आणि त्यावरील व्याज	30/07/2026

अचल मालमत्तेचे वर्णन:- सर्व भाग आणि तुकडा सिटी सर्व्हे क्र. 1652, एकूण क्षेत्रफळ 35,460 चौ.मी. असून त्यापैकी प्लॉट क्र. 61, क्षेत्रफळ 4320 चौ.मी. तसेच त्यावरील बांधकाम क्षेत्र, महसूल गाव सिन्नर येथे स्थित असून, सिन्नर महानगरपालिकेच्या हद्दीत व नाशिक जिल्हा परिषदेच्या बाहेरील क्षेत्रात येते. **सदर मालमत्तेच्या चतुर्सिमा : पूर्वेस :** प्लॉट क्र. 57, **पश्चिमेस :** प्लॉट क्र. 65, **दक्षिणेस :** प्लॉट क्र. 62, **उत्तरेस:** 20 फूट रुंदीचा कॉलनी रस्ता

दिनांक : 30/07/2026 ठिकाण : नाशिक | प्राधिकृत अधिकारी, मेसर्स चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेड

निडो होम फायनान्स लिमिटेड nido HOME FINANCE
(पूर्वीची एडेलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) (निडो), नोंदणीकृत कार्यालय: टॉवर ३, पाचवा मजला, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोळ रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०००७०. क्षेत्रीय कार्यालय: ऑफिस क्र. ४०७-४१०, चौथा मजला, काकडे बिझ्न आयकॉन, सीटीएस क्र. २६८७बी, गणेशखिंड रोड, भांबुर्डे, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र ४११०१६.

सरफेसी अधिनियम, २००२ मधील अनुच्छेद १३(२) अंतर्गत मागणी सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की पुढील कर्जदारांनी निडो यांचेकडून प्राप्त केलेल्या कर्ज सुविधांच्या मुद्दल व व्याजाच्या परतफेडीमध्ये कसूर केली असून सदर कर्ज खाती अनुत्पादक मत्ता (एनपीए) म्हणून वर्ग करण्यात आलेली आहेत. त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी अधिनियम) च्या अनुच्छेद १३(२) अंतर्गत मागणी सूचना पाठविण्यात आली होती. सदर मागणी सूचनेच्या व्यतिरिक्त त्यांना सदर जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येत आहे.
कर्जदार, अनामत, थकबाकी रक्कम, अनुच्छेद १३(२) अंतर्गत पाठविण्यात आलेली मागणी सूचना आणि त्यात मागणी केलेली रक्कम इ.चा तपशील खालीलप्रमाणे आहे :

१. कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदाराचे नाव आणि कर्ज रक्कम :
१. ललित नंदू पगारे (कर्जदार), २. संध्या ललित पगारे (सह-कर्जदार), मातोश्री आश्रम, राजवाडा, सामनगाव, टीपी स्टेशन एकलहरे, एकलहरे, नाशिक-४२२१०१५.
कर्ज खाते क्र.: L0870STHL000005333469 कर्ज करार दिनांक: २८.०३.२०२४
कर्ज रक्कम : रु. १७,५५,०००/- (रुपये सतरा लक्ष पंचावन्न हजार फक्त).
एनपीए दिनांक : ०५.०७.२०२६. **मागणी सूचना दिनांक :** ११.०७.२०२६.
थकबाकी रक्कम : ११.०७.२०२६ रोजीनुसार **देय रक्कम रु. १८,०४,७४८.०६/-** (रुपये अठरा लक्ष चार हजार सातशे अठ्ठेचाळीस आणि सहा पैसे फक्त).
मालमत्तेची अनुसूची : सदनिका क्र. ०३, क्षेत्रफळ सुमारे ६५० चौ.फू. म्हणजे ६०.३८ चौ.मी. बिल्ट-अप, पहिला मजला, श्री गणेश हाइट्स अपार्टमेंट, प्लॉट क्र. ८, क्षेत्रफळ सुमारे ४०० चौ.मी., सर्वे क्र. १३/ए/१, आगरटाकळी गाव, ता. व जि. नाशिक, नाशिक महानगरपालिका, नाशिकच्या हद्दीत. **चतु:सीमा:** पूर्वेस- बिल्डिंग मार्जिन जागा आणि कॉलनी रस्ता, पश्चिमेस- जिना आणि सदनिका क्र. ०१, दक्षिणेस- बिल्डिंग मार्जिन जागा, उत्तरेस- सदनिका क्र. ०२.

२. कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदाराचे नाव आणि कर्ज रक्कम :
मोहन वामन गवळी (कर्जदार), सारिका मोहन गवळी (सह-कर्जदार), चेहडी शीव, किरणनगर, पुणे रोड, नाशिक रोड, नाशिक- ४२२१०१.
कर्ज खाते क्र.: L087BOBST000005332616 कर्ज करार दिनांक : ०२.०२.२०२४
कर्ज रक्कम: रु. १६,९६,०००/- (रुपये सोळा लक्ष शहाण्णव हजार फक्त).
एनपीए दिनांक : ०५.०७.२०२६. **मागणी सूचना दिनांक :** १८.०७.२०२६.
थकबाकी रक्कम : १८.०७.२०२६ रोजीनुसार **देय रक्कम रु. १६,५९,५१८.९४/-** (रुपये सोळा लक्ष एकोणसाठ हजार पाचशे अठरा आणि चौऱ्याण्णव पैसे फक्त).
मालमत्तेची अनुसूची : सदनिका क्र. १६, क्षेत्रफळ सुमारे ४५.४५० चौ.मी. बिल्ट-अप, चौथा मजला, आदिशक्ती अपार्टमेंट, प्लॉटचे क्षेत्रफळ सुमारे ३५३.२७ चौ.मी. (नामपाकडे रस्ता रुंदीकरणासाठी हस्तांतरित केलेले सुमारे १८.२९ चौ.मी. क्षेत्रफळ वजा करून), प्लॉट क्र. ४/५, क्षेत्रफळ सुमारे ३७१.५६ चौ.मी., सर्वे क्र. ३/ए/१/२/४/१, दसक गाव, ता. व जि. नाशिक, नाशिक महानगरपालिका, नाशिकच्या हद्दीत. **चतु:सीमा :** पूर्वेस- मार्जिनल जागा, पश्चिमेस- सदनिका क्र. १५, दक्षिणेस- जिना, लिफ्ट आणि सदनिका क्र. १३, उत्तरेस- मार्जिनल जागा.

३. कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदाराचे नाव आणि कर्ज रक्कम :
प्रवीण फकीरा हुमण (कर्जदार), ताराबाई फकीरा हुमण (सह-कर्जदार), सदनिका क्र २, पहिला मजला, बालाजी प्राइड अपार्टमेंट, भगवान बाबानगर, पेठ रोड, प्लॉट क्र. ३, स.क्र. ४०६/२, मखमलाबाद, ता. व जि. नाशिक- ४२२००३.
कर्ज खाते क्र.: LNSKSTH0000096263 कर्ज करार दिनांक : २८.०२.२०२३
कर्ज रक्कम : रु. २४,९६,०००/- (रुपये चोवीस लक्ष शहाण्णव हजार फक्त).
एनपीए दिनांक : ०५.०७.२०२६. **मागणी सूचना दिनांक :** १८.०७.२०२६.
थकबाकी रक्कम : १८.०७.२०२६ रोजीनुसार **देय रक्कम रु. २६,०७,१६०.८९/-** (रुपये सव्वीस लक्ष सात हजार एकशे साठ आणि एकोणनव्वद पैसे फक्त).
मालमत्तेची अनुसूची : सदनिका क्र. २, पहिला मजला, चटई क्षेत्रफळ सुमारे ५५.२० चौ.मी. आणि वापरयोग्य बाल्कनी ११.३५ चौ.मी., बालाजी प्राइड अपार्टमेंट, पेठ रोड, प्लॉट क्र. ३, स.क्र. ४०६/२, मखमलाबाद, ता. व जि. नाशिक- ४२२००३, नाशिक महानगरपालिका, नाशिकच्या हद्दीत. पूर्वेस- मार्जिनल जागा, पश्चिमेस- सदनिका क्र. ०१, दक्षिणेस- जिना, लिफ्ट आणि सदनिका क्र. ०३, उत्तरेस- कॉलनी रस्ता.
त्यामुळे आपण म्हणजे वर नमूद कर्जदारांना सदर सूचनेच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत वर नमूद करण्यात आलेल्या संपूर्ण थकबाकी रकमेचा भरणा करण्याचे आवाहन करण्यात येत असून तसे न केल्यास निम्नस्वाक्षरीकारांना नाइलाजाने वर नमूद अनामतीवर कारवाई करण्यासाठी सरफेसी अधिनियमांतर्गत पावले उचलावी लागतील. कृपया लक्षात घ्यावे की, सदर अधिनियमातील अनुच्छेद १३(१३) नुसार आपल्याला आमच्या संमतीविना वर नमूद अनामतीची विक्री करणे, ती भाडेपट्टीने देणे किंवा तिच्या संदर्भात इतर कोणताही व्यवहार करण्यास मज्जाव करण्यात येत आहे.

स्थान : नाशिक | स्वा/- प्राधिकृत अधिकारी
दिनांक : ०२.०८.२०२६ | निडो होम फायनान्स लिमिटेडकरिता (पूर्वीची एडेलवाइज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड)

निडो होम फायनान्स लिमिटेड nido HOME FINANCE
(आधी एडलवाईस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)
नोंदणीकृत कार्यालय : ५ वा मजला, टॉवर ३, विंग बी, कोहिनूर सिटी मॉल, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (प.), मुंबई-४०००७०.

ई-लिलाव - वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना

सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ अंतर्गत ई-लिलावाद्वारे विक्री.
सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदार सह-कर्जदार आणि हमीदारांना सूचना देण्यात येत आहे की, कर्जाची थकबाकी वसूल होईपर्यंत सोबतच्या रकान्यात नमूद केलेल्या रकमेच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेली मालमत्ता **'जसे आहे, तिथे आहे', 'जसे आहे, जे आहे' आणि 'तिथे जे काही आहे'** या तत्त्वांवर विक्री करण्यात येईल. कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदार यांनी घेतलेल्या कर्जासाठी सदर ही मालमत्ता **मे. निडो होम फायनान्स लिमिटेड** (आधी एडेलवाइस हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांच्याकडे गहाण ठेवण्यात आली आहे. सुरक्षित धनकोकडे खाली नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा भौतिक ताबा आहे.

अ. क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार यांचे नाव	वसुलीची रक्कम	आरक्षित किंमत आणि ईएमडी	लिलावाची तारीख आणि वेळ
१	**सुहास अनिलराव देशमुख (कर्जदार) श्रद्धा सुहास देशमुख (सह-कर्जदार)**	**रु. २१